# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 12/11/2023 (रविवार) दुपार

---

### जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. कुही :– अंतर्गत २३ किमी अंतरावरील कुही फाटा राजु धाबा येथे दि. ११/११/२०२३ चे ०२.०० वा. ते ०२.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– बिजेन उर्फ पांडु विजयलाल पांडे, वय ५५ वर्ष, रा. डब्लु. सि. एल. टिव्ही टॉवर, ज्योती किराणा स्टोअर्स और बेलीवाले बाबा दर्गा जवळ, सुरेंद्रनगर नागपुर ता. जि. नागपुर हा दिड ते दोन महीण्या पासुन राजु ढेंगरे यांच्या ढाब्यावर भांडे धुण्याचे काम करीत असे व तेथे जेवन करून राहत असे. व फिर्यादी सोबत आरोपी क्र. १) मंडला उर्फ छोटु वय ३५ ते ३६ वर्ष हा ढाब्यावर पोळया करण्याचे व वेटर चे काम करत असे. आरोपी क्र. २) आदी वय २८ ते २९ वर्ष हा वेटरचे काम करत असे. तसेच जामकर नावाची महीला ही पोळी बनवायचे काम करीत असे. दि.११/११/२०२३ रात्री ०१.०० वा. दरम्याण राजु ढेंगरे यांनी जामकर या महीलेला तिच्या घरी सोडुन ढाब्यावर ०१.३० वा आपल्या कारने परत आले. तेव्हा आरोपीनी कामाच्या पैशाची मागणी केली असता मृतक नामे– राजु भाउराव ढेंगरे वय ४८ वर्ष रा. उंद्री ता. उमरेड जि. नागपुर हा दोन तिन दिवसात पैसे देतो असे म्हणाले असता. आरोपी व मृतकात बाचाबाची झाली. मृतक हा आरोपीच्या खाटेवर जावुन झोपुन गेला. व आरोपी सुध्दा बाजुला जावुन झोपुन गेले. अंदाजे ०२.३० वा दरम्याण भांडे पडण्याच्या व मृतकाचा आवाज येत होता जावुन पाहले असता मंडला आणि आदि हा राजु ढेंगरे यांना गळयात लंबी पट्टी बांधुन खिचत होते. त्या नंतर मंडलाने मृतकाला हातातील कडयाने व चाकु सारख्या हत्याराने त्याच्या तोंडावर मारले व आदिने लाकडाने त्यांच्या डोक्यावर मारले व ते राजु ढेंगरे यांना खाटेवर लेटवुन त्यांच्या तोंडावर झाकुन राजु ढेंगरे यांची कार घेवुन तेथुन निघुन गेले. काही वेळानी त्यांचे गावातील नातेवाईक आले असता राजु ढेंगरे हे मरण पावले होते.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे आरोपीतांविरुध्द कलम ३०२, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि नितेश डोर्लीकर मो.क्र. ९५९५६७८२३४ हे करीत आहे.

### चोरी करणा–या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पोलीस स्टेशन मौदा :– अंतर्गत **चारभा शिवार १८ किमी उत्तर**, यातील फिर्यादीचे **शे**तातील महिन्द्रा कंपनीचा ट्रॅक्टर व **शेतात** हिरव्या रंगाची पाटी व दतार ठेवली होती. दिनांक १०/११/२३ रोजी सायंकाळी ०४/०० वा दरम्यान काम करण्याकरीता गेले असता, पाटी व दतार कल्टीवेअर दिसून आले नाही. फिर्यादीचे शेतात ठेवलेली लोखंडी पाटी २०,०००/रूपये व दतार किंमती १५०००/रूपये व २ कल्टीवेअर किंमत ३६,०००/रूपये असा एकुण ७१,०००/रूपयाचा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– **शंकर हरीभाउ पटिये वय ४८ वर्ष रा. चारभा ता मौदा जि नागपूर** यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भादवि अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास **पोहवा हरीश यंगलवार मो क्र. ९४२३२१९४२९** करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर